## !! श्री गणेशाय नमः !!



**GENERAL QUARTERLY BRIEF**

### वैयक्तिक माहिती :

नाव : संगीता कुलकर्णी

लिंग : स्त्री

जन्म तारिख : ०१/०८/१९९०

जन्म वेळ : संध्या. ७वा.२३ मि

जन्म ठिकाण : मुंबई

### जन्म कुंडली:



**आपल्या कुंडलीचे सर्वांगीण विवेचन**

**१. स्वभाव व व्यक्तिमत्व :-**

आपल्या जन्मसमयी पूर्व क्षितिजावर शनिची कुंभ रास उदित होत होती यावरुन आपण प्रमाणात उंच, सांभाळून काम करणारी, स्वभाव काहीसा मानी, मानसन्माची आवड असणारी, उच्च विचारसरणी, नवनवीन कल्पना जन्माला घालणारे असे आहात. ही वायुतत्वाची रास असल्याने सतत काहीतरी शिकण्याचा कल दिसून येतो. वाचनाची व संशोधनाची अत्यंत आवड निर्माण होईल. महत्त्वाकांक्षा, उत्साह, उतावीळपणा, हटवादीपणा, तापटपणा याची जाणीव होईल. आपल्या पत्रिकेच्या लग्न स्थानावर शुक्राची तसेच बुधाची दृष्टी असल्याने काही कलात्मक तसेच बौध्दिक गोष्टींची आवड निर्माण होण्याची शक्यता आहे.

आपले जन्मनक्षत्र आश्लेषा आहे. या नक्षत्राचा स्वामी बुध ग्रह आहे. यावरुन हजरजबाबी, बुध्दिमान, परिवर्तनशील, भावनाप्रधान असे असाल. संकटाला न डगमगता त्याला सामोरे जाणे व मुकाबला करणे हे आश्लेषा नक्षत्राचे वैशिष्टये आहे. कुठल्याही गोष्टीला चांगल्या गोष्टींची साथ असेल तर कोणतेही कठीण काम पूर्णपणे सिध्दीस नेणे अवघड जात नाही हे आपण व्यवहारातही पाहतो.

आपली चंद्र रास कर्क आहे. ती जलतत्वाची राशी आहे. कर्क या राशीचा राशीस्वामी चंद्र आहे. अतिशय भावनाप्रधान स्त्री तत्वाची अशी राशी आहे. चंद्र हा मनाचा कारक आहे. अतिशय चंचल असा स्वभाव आपल्यापेक्षा इतरांची काळजी घेण्यात अग्रेसर असाल. एकाच राशीतील रवि व मंगळ रागावर नियंत्रण ठेवण्याचे संकेत देत आहे. शनि महाराजांची चंद्रावरील दृष्टी काहीसा नकारात्मक सूर देणार आहे. गुरुची नववी दृष्टी अध्यात्म तसेच शैक्षणिक ओढा दाखवण्यास कारणीभूत होत आहे.

आपल्या पत्रिकेला कालसर्पयोग दर्शवित आहे. हा योग आपल्या पत्रिकेत जन्मापासून आहे. या योगामुळे मनातील बरेच संकल्प वेळेवर पूर्ण होताना दिसत नाहीत, केलेल्या कामाचे श्रेय मिळत नाही. निर्णय घेताना चुका होताना दिसतात. आपले ते खरे करण्याची वृत्ती निर्माण होते. आपल्याबद्दल लोकांच्या मनात कारण नसताना अनेक गैरसमज होताना दिसतात. अनवधानाने घरात काहीप्रमाणात वाद विवादाला सामोरे जावे लागण्याची शक्यता असते. सदर त्रास शंकराची उपासना किंवा राहू मंत्राने कमी होईल.

## २. आरोग्य:-

आरोग्याच्या दृष्टीने विचार करता आपला लग्नेश शनि नवम स्थानात गेला आहे. नवमस्थान हे प्रवासाचे तसेच कामानिमित्त घराबाहेर राहण्याचे स्थान आहे. त्यामुळे शरीर प्रकृत्तीवर फार ताण पडण्याची शक्यता दर्शवित आहे.

आपला चंद्र जलतत्वाच्या राशीचा असला तरी तो षष्ठस्थानात म्हणजे रोगस्थानात असून मंगळ रविच्या सान्निध्यात असल्याने काही प्रमाणात मानसिक तापटपणा येण्याची शक्यता आहे. चंद्रावर शनिची दृष्टी येत असल्याने मन काही वेळेला उदासीन होताना दिसेल किंवा त्याचे खच्चिकरण झालेले पहाण्यात येईल. तेव्हा मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. एकंदर शारीरिक व मानसिक आरोग्याला जपणे हे आपले पहिले कर्तव्य असेल त्यात कोणतीही तडजोड करु नये. जानेवारीच्या पहिल्या पंधरवडयात आपल्या राशीच्या व्ययस्थानातून रवि भ्रमण करणार असल्याने आरोग्याची काळजी घेणे गरजचे आहे. जमल्यास प्रवास टाळा. फेब्रुवारी महिन्यात आपल्याच लग्नस्थानातून भ्रमण करेल. आरोग्याच्या बऱ्याच तक्रारी कमी होतील. परंतु आरोग्यासाठी व्यायामाला महत्व दया. मार्च महिन्यात त्याचे द्वितीय स्थानातील भ्रमण संमिश्र स्वरुपाचे असतील. प्रवासात बाहेरचे जेवण तसेच अति तिखट मसालेदार पदार्थ खाण्याने तसेच अति अवेळी खाण्याने शरीरावर वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे. जास्तीत जास्त फळांचा रस किंवा फळे यांच्यावर भर द्यावा. कोणत्याही परिस्थितीत अंगावर दुखणी काढु नयेत. विश्रांती घेणे गरजेचे आहे.

## ३. आर्थिक लाभ :-

आपली पत्रिका आर्थिक लाभाच्या दृष्टीने अतिशय उत्तम राहील यात शंका नाही. सांपत्तिक परिस्थिती मेहनतीने सुधारेल. आपल्या धनस्थानाचा मालक गुरु असून तो कर्मस्थानात असल्याने आपल्या बोलण्यातून आर्थिक प्राप्ती होईल. शिवाय गुरुची धनस्थानावर दृष्टी आहे. गुरु ज्या स्थानावर दृष्टी ठेवतो त्याची वृध्दी होते. फक्त हर्षलची गुरुबरोबर असलेली अंशात्मक युती अचानक खर्च करण्यास भाग पाडणार आहे. २१/१२/२०१७ ते १९/०२/२०२१ शनिची अंतरदशा आहे. शनि भाग्यस्थानात आहे. जानेवारी या महिन्यात व्ययस्थानातून चालेले रविचे भ्रमण खर्चाच्या अनेक वाटांवर नियंत्रण आणावे लागेल. खर्च करताना थोडासा विचार करावा लागेल जमल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. फेब्रुवारी या महिन्यात कामातील यश आपणांस आर्थिक लाभ मनासारखे देण्यास समर्थ आहेत. आर्थिक आलेख उंचावण्यास मदत होईल. मार्च या महिन्यात रविचे धनस्थानातील भ्रमण खर्च कमी करायाला सुचवत आहे. आर्थिक स्थिती बलवान करण्याचा प्रयत्न करा. नीट नियोजन करुन धनार्जनासोबत धनं संचय करा. उसने पैसे देताना चार वेळेस विचार करावा. एप्रिल या महिन्यात आपणांस विशेष काळजी घ्यावी लागेल. कोणत्याही आर्थिक कागदपत्रावर पूर्ण विचार करुनच सही करावी, विशेषत: व्यापारसंबंधी करण्याचे लेखी व्यवहार. पैशाचा सततचा ओघ लक्षात घेता भविष्यकालीन योग्य गुंतवणूक हितकारक आहे.

## ४. कौटुंबिक सौख्य :-

कौटुंबिक सौख्याच्या दृष्टीने विचार करता गुरु महाराजांची द्वितीय व चतुर्थ स्थानावरील दृष्टी कौटुंबिक सुख देण्यास समर्थ आहेत. तुमची कर्करास सर्वांना आपलेसे करणारी आहे. तुमच्या मानसिकतेमुळे तुमचे पारिवारिक जीवन सुख शांती आणि समृध्दीने युक्त राहिल. सगळे कुटुंबिय एकत्रित आनंदाने गुण्यागोविंदाने राहण्याचे संकेत आहेत. हर्षलची यास्थानावर दृष्टी येत असल्याने कधी तरी चहाच्या पेल्यातील वादळे अचानक येतील आणि निघूनही जातील. जानेवारी या महिन्यात आपल्या सर्व परिवाराला घेऊन लांब फिरायला घेऊन जाण्यास उत्तम असा आहे. वडिलधाऱ्यांची काळजी घ्यावी. फेब्रुवारी या महिन्यात आपले ते खरे करण्याचा अट्टाहास घरामध्ये धरु नका. कुटुंबियांना आपलेसे करुन पुढे वाटचाल करा. घरातील वातावरण सौम्य ठेवण्यांचा प्रयत्न करा. मार्च या महिन्यात नाती टिकवण्यासाठी बोलण्यावर वचक ठेवा, शक्यतो दुखवू नका. घरात थोडे मानापमानाचे प्रसंग उदभवतील तरी गृहसौख्य लाभेल मान सन्मानही मिळेल. एप्रिल या महिन्यात स्थलांतराचे योग येतील पण उतावळेपणाने निर्णय घेऊ नका. कौटुंबिक प्रश्न असंतोष वादाचे प्रसंग होणार नाहीत यांच्याकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. नातेवाईकांवर अवलंबून राहू नका. कुटुंबातील व्यक्तीच्या मनाचा विचार करा. त्यांच्या अचानकपणे बदलणाऱ्या स्वभावाचे कारण शोधा. जास्तीत जास्त वेळ त्यांना देण्याचा प्रयत्न करा.

## ५. नोकरी /व्यवसाय :-

नोकरी किंवा व्यवसायाच्या दृष्टीने विचार करता आपले कुंभ लग्न असून त्याचा स्वामी शनि आहे. त्यामुळे नोकरीच्या क्षेत्रात शनिची चिकाटी, संयम व सातत्य यासारखे गुण आपल्याकडे असल्याने आपण व्यवस्थित काम करण्याचे संकेत दर्शवितात. लग्नराशीस्वामी शनि नवमस्थानात म्हणजे शिक्षणाच्या स्थानात असल्याने ज्ञानदानाचे काम करण्यास आपणांस उत्तम होईल. शिवाय कर्म स्थानात गुरु हर्षल असल्याने त्याला पोषक असे वातावरण प्राप्त होईल. कर्मस्थानातील हर्षल नोकरीच्या क्षेत्रात स्थिरता देण्यास अनुकूल नाही.

व्यवसायासाठी आपणास भागिदारी करणे योग्य होणार नाही याची दक्षता घ्या. ज्या क्षेत्रात काम करणार आहात तिथे तुम्हाला मान सन्मान मिळेल तसेच नोकरीच्या क्षेत्रात तुम्हाला इच्छित उन्नती आणि मानसिक समाधान प्राप्त होण्याचे संकेत आहेत. १९/०२/२००५ ते १९/०२/२०२५ शुक्राची महादशा आहे. २१/१२/२०१७ ते १९/०२/२०२१ शनिची अंतरदशा आहे. शनि नवमस्थानात असून तो आपला लग्नेश असल्याने शैक्षणिक क्षेत्रासाठी उत्तम असेल. या कालावधीमध्ये आपले लांबचे प्रवास होतील. अनेक चांगल्या प्रतिष्ठीत लोकांच्या गाठीभेटी होतील. जानेवारी हा महिना कामासाठी दूरच्या प्रवासाला राखून ठेवावा लागेल. कामातील आपला आत्मविश्वास कमी होत नाही ना याची काळजी घ्या. बदलीची शक्यता नाकारता येत नाही. फेब्रवारी हा महिना आपल्या आत्मविश्वासाची प्रचीती देणारा आहे. आपणास आपल्या कामात मानाचे स्थान मिळेल. साहसाचे, धाडसाचे कौतुक होईल. मार्च या महिन्यात अनेक प्रकारचे लाभ मिळण्याची संधी मिळेल. आपल्या व्यवहारात नियमांचे काटेकोर पालन करा. एप्रिल या महिन्यात परदेशाशी संबंधित व्यवहारातून फायदा होईल. नवे करार करता येतील. विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या स्विकारण्याची तयारी ठेवा. एखादे महत्वाचे काम विशिष्ट मंजूरीसाठी अडून राहिले असेल तर ती मिळू शकेल.

कालनिर्णय

**६. शुभ अशुभ दिवस :-**

आश्लेषा, मघा, उत्तरा फाल्गुनी, चित्रा, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा मूळ, उत्तराषाढा, ध निष्ठा, पूर्वा भाद्रपदा, उत्तरा भाद्रपदा, रेवती, अश्विनी, कृत्तिका, मृग, पुनर्वसु, पुष्य या नक्षत्रात ज्या दिवशी तुमचा चंद्र असेल तो दिवस कोणतेही शुभ कामे करण्यास फायदेशीर होईल.

पूर्वा फाल्गुनी, हस्त, स्वाती, पूर्वाषाढा, श्रवण, शततारका, भरणी, रोहिणी, आर्द्रा या नक्षत्रात ज्या दिवशी तुमचा चंद्र असेल त्या दिवशी शक्यतो महत्वाची कामे घेऊ नका. काहीसे संमिश्र असे ग्रहमान आपल्याला पाहायला मिळेल.

**७. लाभदायक देवता :-** शंकर / हनुमान

**८. शुभ राशी :-** सिंह, तुला, धनु, वृश्चिक

**९. शुभ रंग :-** जांभळा, निळा, करडा,

**१०.शुभ रत्न :-** निलम

!! शुभम् भवतु !!

**-: DISCLAIMER :-**

An astrological prediction or any other advice is just an opinion of the astrologer/ pundit. Though all the predictions/ advices are provided by a panel of eminent astrologers/ pundits, the same should not be used as a substitute to an advice of a licensed professional, medical / psychiatric treatment, study, a curriculum, profession or life style. The predictions, opinions and remedial measures of two astrologers/ pundits on one horoscope or issue may differ and have varied results.

While all precautions are taken for the accuracy of the contents, the maker of these makes no warranties, either express or implied.

In case of any dispute arise it will be subjected to Mumbai jurisdiction only

# ।। प्रज्ञावर्धनस्तोत्रम्।।

अस्य श्रीप्रज्ञावर्धनस्तोत्रमंत्रस्य, सनत्कुमार ऋषिः, स्वामी कार्तिकेयो देवता,अनुष्टुप छंद मम सकलविद्यासिध्यर्थे जपे विनियोगः।

श्रीस्कंद उवाच।।

योगीश्वरो महासेन, कार्तिकेयोग्निनंदनः।
स्कंद कुमारः सेनानीः, स्वामीशंकरसंभवः।।१।।
गांगेयस्ताप्रचूडक्ष, ब्रह्मचारी शिखिध्वजः।
तारकारिरुमापुत्रः क्रौंचारातिः षडाननः।।२।।
शब्दब्रह्मस्वरूपश्च, सिद्धः सारस्वतोगुरुः।
सनत्कुमारो भगवान्, भोगमोक्षप्रदप्रभुः।।३।।
शरजन्मा गणाधीशपूर्वजो मुक्तिमार्गकृत्।
सर्वागप्रणेताच, वांच्छितार्थप्रदर्शनः।।४।।
अष्टविंशति नामानि, मदायानि च यः पठेत्।
प्रत्यूक्षे श्रद्धया युक्तो मूको वाचस्पतिर्भवेत्।।५।।
महामंत्रमयानीति, मम नामानि कीर्तयेत्।
महाप्रज्ञामवाप्नोति, नात्र कार्या विचारणा।। ६।।
इति श्रीस्कंदपुराणे कार्तिकेयमाहात्म्ये
प्रज्ञावर्धनस्तोत्रं संपूर्णम्।।